# सुडाग्नि भडकणार

अमेरिका आणि इस्रायलकडून होत असलेल्या भीषण हल्ल्यात इराणचे बलाढ्य सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. अमेरिका आणि इस्त्रायल या दोनही देशांनी इराणमधील ७ नेत्यांचा खात्मा करण्याचा इरादा स्पष्ट केला होता. आता इराणच्या सत्तेचे प्रमुखच खामेनी यांनाच संपवले. आखाती देशांमध्ये आता बदले की आग सुरू होईल, असे दिसते. खामेनी यांच्या हत्येचा बदला घेतला जाईल,असा इशारा इराणकडून दिला गेला आहेच.ट्रम्प यांची हत्या करण्याचा फतवाच काढला गेलाय. त्यामुळे हे सुडाग्नि युद्ध अधिक भडकण्याची चिन्हे दिसत आहेत. मीडिया अहवालानुसार, खामेनी हे सुरक्षा परिषदेचे सल्लागार अली शमखानी आणि इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचे प्रमुख मोहम्मद पाकपूर यांच्यासोबत बैठक घेत असताना इस्त्रायलने त्या ठिकाणी बॉम्ब हल्ला केला. रिपोर्ट्सनुसार, इस्त्रायल आणि अमेरिका अली शमखानी यांचा सातत्याने मागोवा घेत होते. शनिवारी ते खामेनी यांना भेटण्यासाठी गेले असताना, दोन्ही देशांनी संयुक्तरीत्या खाम ेनी यांच्यावर हल्ला केल्याचा दावा करण्यात आला आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्यपूर्वेत तणाव तीव्र होणे साहजिकच आहे. या संघर्षाचा थेट परिणाम भारतावरही पुढील काही दिवसांत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. इराणमध्ये सत्तांतर घडवून आणण्याचा अमेरिकेचा दीर्घकालीन प्रयत्न होता. त्याप्रमाणे अमेरिका आणि इराण यांच्या धुसफूस सुरू होती. ट्रम्प यांनी अनेक वेळा तसा इशाराही दिलेला होता. खामेनी यांच्या जाण्याने इराणमधील राजकिय समीकरणे बदलू शकतात. त्यांच्या ४७ वर्षांच्या प्रभावशाली कारकिर्दीनंतर सत्तास्थितीत मोठे बदल संभवतात, असे आंतरराष्ट्रीय अभ्यासक सांगतात. संघर्षामुळे जागतिक तेल व गॅस बाजारात तात्पुरता तुटवडा निर्माण होऊ शकतो. पेट्रोल, डिझेल व स्वयंपाक गॅसच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. वीजदरही महाग होऊ शकतात. इंधन दरवाढीचा परिणाम वाहतूक, अन्नधान्य, औषधे आदी वस्तूंवर होतो. त्यामुळे सर्व देशांत महागाई वाढू शकते. भारतही त्याला अपवाद असणार नाही. युद्ध वाढल्यास लेबनॉन, येमेन यांसारख्या देशांपर्यंत संघर्ष पसरू शकतो. इराणचे सहयोगी




गट सक्रिय झाल्यास तणाव आणखी वाढू शकतो. संघर्ष दीर्घकाळ चालल्यास अमेरिकेला मध्यपूर्वेत आपली सैन्य उपस्थिती वाढवावी लागू शकते. अमेरिकेच्या दबावानंतरही इराणने अण्वस्त्रनिर्मिती नाकारली होती. मात्र अस्तित्त्वाच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराण भविष्यात अणुशस्त्र कार्यक्रम गतिमान करू शकतो. या संघर्षात अमेरिका-इस्रायल सक्रिय आहेत. आशियातील प्रमुख देश रशिया, चीन आणि भारत यांची भूमिका पुढील घडामोडींमध्ये निर्णायक ठरू शकते. होर्मुझ सामुद्रधुनीत अडथळा निर्माण झाल्यास जगातील सुमारे २० टक्के तेल व्यापारावर परिणाम होईल. भारताच्या तेलपुरवठ्यावरही त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. युद्धाच्या भीतीमुळे गुंतवणूकदार सावध भूमिका घेतात. ऊर्जा व तेल क्षेत्रातील समभागांध्ये मोठी चढ-उतार होण्याची शक्यता आहे. भारतीय बाजारातही अस्थिरता वाढू शकते. इराण व शेजारी देशांतील लोक युरोप किंवा आशियातील देशांकडे स्थलांतर करू शकतात. त्यामुळे निर्वासितांचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन झाल्याचा आरोप होत असताना संयुक्त राष्ट्र संघाची भूमिका मर्यादित राहिल्याचे दिसते. त्यामुळे जागतिक पातळीवरील त्याच्या प्रभावावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकूणच, या संघर्षामुळे केवळ मध्यपूर्व नव्हे तर जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा बाजार, राजकारण आणि भारताच्या आर्थिक स्थैर्यावरही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मध्य पूर्वेतील तणावाने आता धोक्याची पातळी ओलांडली आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांना इराणनेही प्रत्युत्तर दिले आहे. या हल्ल्याचा परिणाम भारतासह संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. २०२५ मध्ये इराण-इस्त्रायल युद्ध आणि इराण समर्थीत गटांशी झालेल्या संघर्षांमुळे इस्त्रायलच्या नेत्यांनी जानेवारी महिन्यात इराणला वारंवार इशारा दिला होता की, ते त्यांच्या अण्वस्त्र कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र क्षमतांचा अनियंत्रित विस्तार करू देणार नाहीत. परंतु, इराणने अशा कोणत्याही गोष्टींना जुमानले नाही. इराणने आपला संवेदनशील अण्वस्त्र कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र संबंधित प्रक्रिया सुरूच ठेवल्या. अनेकदा इशारे देऊनही इराण थांबत नाही, असे दिसताच इस्रायल आणि अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानवर हल्ला चढवला, ज्यामुळे मध्य पूर्वेत पुन्हा एकदा तणाव निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे. इराण हा जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांपैकी एक आहे. युद्ध अधिक भडकल्यास, पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. आखाती देशांमधील इराण आणि इराक यांच्यावर अमेरिकेने नेहमीच वक्रदृष्टी ठेवली आहे. हे दोनही देश बलाढ्य आहेत. अमेरिकेला जुमानत नाहीत. खामेनी हे तर अमेरिकेला सैतान म्हणायचे. माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी इराकचे प्रमुख सद्दाम हुसेन यांना फासावर कसे लटकवले हे जगाने पाहिलेही आहे. त्याच धर्तीवर ट्रम्प यांची तीच दडपशाही सुरू आहे. टॅरिफ वाढवून काही देशांना धमकावले तर व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षाला बंदी करून त्यांनी दहशतही निर्माण केली. आता तर इराणवर हल्ले करून तिसऱ्या महायुद्धाचे रणशिंगच फुंकले आहे, असे म्हणावे लागेल.



## विशेष लेख

# राज्यपालांचे अभिभाषण केवळ शब्दांची बोळवण

*राज्यपालांचे अभिभाषण हे संविधानानुसार सरकारच्या मंत्रिमंडळाने तयार केलेले असते. ते सरकारचे सेल्फ प्रमोशन' असते. यात सकारात्मक आकडे निवडकपणे मांडले जातात, अपयश लपवले जाते आणि भविष्यकालीन स्वप्ने दाखवून सध्याच्या समस्यांकडे लक्ष वेधले जाते. पण वास्तवाकडे डोळस नजर टाकली तर हे अभिभाषण फक्त शब्दांची बोळवण वाटते आकडे मोठे, घोषणा भव्य, पण प्रत्यक्ष जमिनीवर उतरणारे बदल दिसत नाहीत.*

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या (२०२६) पहिल्या दिवशी, २३ फेब्रुवारीला राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिलेले अभिभाषण हे राज्य सरकारच्या (महायुती) धोरणांचे आणि उपलब्धींचे एक आकर्षक चित्रण होते. भाषणात ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न, १.६४ लाख कोटी एफडीआय (२०२४-२५), पहिल्या सहा महिन्यांत ९१,३३७ कोटी एफडीआय, व्हिजन मॅनेजमेंट युनिट, नवीन इंडस्ट्री पॉलिसी, समृद्धी महामार्ग विस्तार, कृषीमध्ये एआय, विदर्भ विकास, लखपती दीदी योजना, २०२७ नाशिक कुंभमेळा तयारी आणि 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर मास्टरप्लॅन' असे अनेक मुद्दे मांडले गेले. हे सर्व ऐकून वाटते की महाराष्ट्र विकासाच्या महामार्गावर वेगाने धावतोय.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था खरंच भारतातील सर्वात मोठी आहे. जीडीपी मध्ये १३.५% योगदान, एफडीआय मध्ये अग्रेसर. पण हे आकडे कितपत वास्तविक आहेत? २०२४-२५ मधील १.६४ लाख कोटी एफडीआय चा मोठा भाग करार आणि घोषणांवर आधारित आहे. प्रत्यक्ष प्रकल्प उभारणी, रोजगार निर्मिती आणि ग्रामीण भागात त्याचा फायदा याबाबत स्पष्ट आकडे नाहीत. अनेक मोठे प्रकल्प जसे डेटा सेंटर्स, हरित ऊर्जा कागदावर आहेत, जमिनीवर नाहीत.

**बेरोजगारी - शेतकरी आत्महत्या**

बेरोजगारी हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा प्रश्न आहे. युवकांच्या हातात काम नाही, शिक्षित बेरोजगारी वाढली आहे. सरकार लाखो रोजगारांच्या घोषणा करते, पण स्वतंत्र आकडेवारीनुसार राज्यातील बेरोजगारी दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. 'लखपती दीदी' सारख्या योजना ग्रामीण महिलांसाठी चांगल्या आहेत, पण त्या किती टक्के महिलांपर्यंत पोहोचल्या? ग्रामीण भागात अजूनही मूलभूत सुविधा रस्ते, वीज, पाणी, आरोग्य आदी अपुऱ्या आहेत. शहरांमध्ये मुंबई, पुणे, नागपूरमध्ये ट्रॅफिक, पूर, हवेचे प्रदूषण, महागाई यामुळे सामान्य माणसाचे जीवन कठीण झाले आहे.

शेती हा महाराष्ट्राचा कणा आहे, पण शेतकरी आजही संकटात आहे.



आत्महत्या थांबलेल्या नाहीत, कर्जबाजारीपणा वाढला आहे. हमीभाव, उत्पादन खर्च, बाजारभाव यांचा प्रश्न कायम आहे. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, दुष्काळ यामुळे रब्बी-खरीप दोन्ही हंगामात नुकसान झालेय.

**अ‍ॅड. हर्षल प्रधान,**
प्रवक्ते आणि जनसंपर्कप्रमुख,
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष

सरकार मदत जाहीर करते ३१ हजार कोटी, २२३६ कोटी पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात किती पोहोचते? ३० टक्केही नाही. 'प्रति थेंब अधिक पीक' सारख्या योजना चांगल्या आहेत, पण त्यांची अंमलबजावणी अपुरी पडते. एआय कृषीमध्ये आणण्याच्या घोषणा आहेत, पण शेतकऱ्यांना इंटरनेट, स्मार्टफोन, प्रशिक्षण याची कमतरता आहे.

**सीमावाद आता जुनाट प्रश्न**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा १९५६ पासून चाललेला जुनाट प्रश्न आहे. अभिभाषणात 'मास्टरप्लॅन आणि प्रख्यात वकील' नेमल्याचे सांगितले. पण सर्वोच्च न्यायालयात २००४ पासून प्रलंबित असलेला हा दावा अजूनही सुनावणीत अडकला आहे. सीमाभागातील मराठी भाषिकांना कन्नड लादले जात आहे, शाळा-संस्कृतीवर निर्बंध, हिंसक घटना याबाबत सरकारची भूमिका फक्त कागदावर दिसते. सीमावादाचा मुद्दा हा फक्त राजकिय स्टंट राहिला आहे, प्रत्यक्षात काहीच प्रगती नाही.

अभिभाषणात ऐतिहासिक व्यक्तींचा गौरव केला शिवाजी महाराज, आंबेडकर, अहिल्यादेवी आदींचा उल्लेख केला गेला. पण सध्याच्या राजकारणात हे गौरव फक्त भाषणांसाठीच दिसतात. राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे शब्दांचा बाजार, फेक आकडे असं राहिलं आहे. शेतकरी, बेरोजगार, गुंतवणूकदार सर्व अडचणीत असताना हे अभिभाषण सरकारच्या 'विकसित महाराष्ट्र'च्या ब्रँडिंगचा डंका वाजवत आहे.

२०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर हे ध्येय दाखवत आहे, पण त्यासाठी गरिबी, असमानता, पर्यावरण, शिक्षण-आरोग्य यावर खरा भर हवा. सध्याचे वास्तव वेगळे आहे. शहर-ग्रामीण फरक वाढला, महागाई नियंत्रणात नाही, आरोग्य व्यवस्था कोलमडली, शिक्षण गुणवत्तापूर्ण नाही. राज्यपालांचे अभिभाषण हे लोकशाहीतील एक महत्त्वाचे विधान आहे, पण ते 'सत्य' चे प्रतिबिंब नसते. ते सरकारचे दृष्टिकोन दाखवते. वास्तव मात्र जनतेच्या अनुभवात आहे. रोजच्या संघर्षात, बेरोजगारीच्या यादीत, शेतकऱ्यांच्या कर्जात, सीमावासीयांच्या तक्रारीत. जोपर्यंत घोषणा आणि अंमलबजावणी यांच्यातील अंतर कमी होत नाही, तोपर्यंत हे अभिभाषण फक्त शब्दांची बोळवण राहील.

महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने विकसित होण्यासाठी सरकारने आकड्यांऐवजी प्रत्यक्ष बदलावर भर द्यावा. विरोधकांनीही टीका करण्याऐवजी पर्यायी दृष्टिकोन मांडावा. आणि जनतेने हे अभिभाषण ऐकून नव्हे, तर प्रत्यक्ष बदल पाहून निर्णय घ्यावा. अन्यथा, हे शब्द फक्त हवेत विरघळतील.

▶▶ ▶▶ ▶▶

## टुडेज् ब्लॉग

# जगण्याची शाश्वती राहिली नाही

बातम्या अशा आहेत की तेहरानमधील राजप्रासादात इराणचे सर्वेसर्वा खामेनाई अमेरिका-इस्रायलच्या बाँबिंगला बळी पडलेत. इराणच्या रस्त्यावरची काही दृश्यं माध्यम दाखवत आहेत. तिथली माणसे भयभीत झाली आहेत. आपल्या देशाच्या सर्वोच्च माणसाला बाहेरच्या देशातल्या कोणीतरी ठार मारलंय याचा धक्का त्यांना बसलाय. एका दृश्यामध्ये माणसं आनंदचकित झाली आहेत. गेली वीस वर्षापेक्षा जास्त काळ आपल्याला छळणाऱ्या क्रूर माणसाचा मृत्यू झालाय याचा आनंद त्यांना झालाय.

गेले महिनाभर इराण आणि अमेरिकेचे प्रतिनिधी जगात कुठं कुठं चर्चा करत होते. ट्रम्प यांचं सुरुवातीचं म्हणणं होतं की, इराणनं अण्वस्त्रं तयार करणं थांबवावं. अमेरिकेने इराणविरोधात आर्थिक बंधने घातली होती, त्याचा फटका इराणला बसला होता. इराण म्हणत होतं की बंधने काढा आणि अण्वस्त्राबाबत चर्चा करू. चर्चा अनिर्णित होती.

गेल्या वर्षी अमेरिकेने इराणच्या अणुविकास केंद्रावर हल्ला केला होता, इराणचा अणुकार्यक्रम पूर्ण उद्ध्वस्त करून टाकला आहे, असं ट्रम्पनी जाहीर केलं होतं. तरीही अण्वस्त्रांचा प्रश्न कसा काय आला? चार सहा महिन्यात अण्वस्त्रं कार्यक्रम विकसित करता येतो? वैज्ञानिक तर सांगतात की तसा कार्यक्रम विकसित करायला कित्येक वर्षं लागत असतात.

एकाएकी अण्वस्त्राच्या बातम्या थांबल्या. इराणकडं लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रं आहेत, ती धोकादायक आहेत, ती इराणनं नष्ट करावीत, अशी मागणी कधी ट्रम्प करु लागले तर कधी नेतान्याहू करू लागले.

इस्रायल आणि अमेरिका तर उठसूट प्रचार करतात की क्षेपणास्त्रं थांबवण्याची आणि नष्ट करण्याची अत्यंत प्रभावी यंत्रणा त्यांच्याजवळ आहे. आयर्न डोमचं गुणगान इस्रायलची पीआर यंत्रणा सतत करत असे. मग अचानक इराणची क्षेपणास्त्रं चर्चेत कशी काय उपटली?

**चर्चेचे गुऱ्हाळ सुरु होते**

दोन दिवसांपूर्वी एकाएकी थकलेले ट्रम्प कॅमेऱ्यासमोर आले. 'या अनिर्णित चर्चेला मी कंटाळलो आहे. इराणचं सरकार बदलणं सोडून दुसरा पर्याय मला दिसत नाहीये' असं ट्रम्प म्हणाले. तोवर काही दिवसांपासून अमेरिकेनं आपलं नौदल जगभर जाहिराती करत जगभर पसरलं होतं.



ट्रम्प इराणवर हल्ला करणार हे स्पष्ट होत होतं.

आठवून पहा. पुतीननी युक्रेनच्या हद्दीवर दीड लाख सैन्य नेऊन ठेवलं होतं. पुतीन युक्रेनवर हल्ला करणार आहेत हे जगाला कळलं होतं. दीड लाख सैन्य हद्दीवर चणेफुटाणे भेळ खायला कुणी नेऊन ठेवतं काय? पुतीन सांगत होते की बरेच दिवस एका जागी बसून कंटाळलेल्या सैन्याला पाय मोकळे करायला युक्रेनच्या हद्दीवर पाठवलंय. पुतीननं युद्ध सुरु केलं. आज चार वर्षे झाली युद्धाला, युद्ध थांबलेलं नाही. युद्ध आपण थांबवलं असा दावाही ट्रम्पनी केला आणि शांततेच्या नोबेलची मागणी केली. युद्ध अजूनही सुरु आहे. इराणवर बॉम्ब पडू लागले. इराणनं प्रतिहल्ला केला. माणसं मरू लागली.

तेहरानच्या राजप्रासादावर बॉम्ब पडले. एका इराणी स्त्रीनं योग्य रीतीनं बुरखा न घालता चेहरा-केस उघडे ठेवले होते. या आरोपावरून त्या स्त्रीला तुरुंगात घालण्यात आलं होतं. तिथं तिचा छळ झाला, छळात ती मेली. हज्जारो स्त्रिया सरकारच्या क्रूर सैनिकांना न घाबरता रस्त्यावर आल्या. त्यांनाही सरकारनं मारलं. गेली किमान १० वर्षे इराणी जनता आंदोलन करत आहे. जनतेची मागणी होती की त्यांना बोलण्याचं स्वातंत्र्य द्या, सत्तेवर बसलेल्या धर्मनेत्याला हटवण्याचं स्वातंत्र्य द्या.

इराणची अर्थव्यवस्था पार कोसळलेली आहे. त्याचं एक कारण अमेरिकेनं घातलेले आर्थिक निर्बंध हे आहे. अमेरिकेच्या आर्थिक निर्बंधाचं कारण इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम होता. तेंव्हा चुलीत घाला अण्वस्त्रं, तो पैसा देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी वापरा असं काही इराणी नागरीक म्हणत होते.

इराणी सरकारकडं सैन्य आहे, शस्त्रं आहेत. नागरीक निःशस्त्र आहेत. जगात सर्वच ठिकाणी असं असतं. इराणचं वैशिष्ट्य म्हणजे इराणी धर्मनेत्यांची एक खाजगी सेनाही इराणमध्ये आहे. ही सेना माणसं धर्माचरण नीट करतात की नाही ते तपासत असते. नमाजाच्या वेळी लोक नमाज पढतात की ऑफिसात कामं करत असतात याची पहाणी धर्मसैनिक करतात. कोणी संगीत ऐकतंय कां? कोणी पश्चिमी साहित्य वाचतंय कां? कोणी जगभरातले सिनेमे पहातंय का यावर हे सैनिक लक्ष ठेवतात. अफगाणिस्तानात तर लोकांच्या दाढीची लांबी मोजत, फूटपट्ट्या घेऊन. अमूक इंचापेक्षा कमी दाढी दिसली की तुरुंग आणि फटके.

इराणमध्ये हुकूमशाही होती. हुकूमशाही एका माणसाची होती, त्या माणसानं जमवलेल्या गँगची होती. हुकूमशहानं धर्माचा आधार घेतला होता. प्रत्येक हुकूमशहाला कसला तरी आधार लागतो. चीनमध्ये कम्युनिझमचा आधार, रशियात रशियन अस्मितेचा आधार, इस्रायलमध्ये अरब मुस्लिमांना नष्ट करण्याचा आधार, इराणला इस्लामचा आधार. हिटलरला ज्यू मुक्त जग हवं होतं, नेतान्याहूना अरब मुक्त पॅलेस्टाईन हवंय. हूकूमशाहीकडं पाशवी शक्ती असते, जनतेकडं याचना करणं एवढंच असतं. अयातुल्ला खोमेनी यांच्यानंतर अली खोमेनाई यांचं राज्य आलं. खोमेनी आणि खामेनाई दोघांनीची लाखो माणसं (इराणी आणि इराकी) मारली. ते त्यांना जमलं. कारण इराणी जनतेची दुर्बलता. जनतेनं क्रूरकर्म्यांना सत्तेत बसवलं आणि त्यांच्या हातून स्वतःचा नाश करवून घेतला.

नेतान्याहू आणि ट्रम्प, दोघांवरही भ्रष्टाचार आणि कायदा तुडवण्याचे अनंत आरोप आहेत. कोणाची तरी भ्या दाखवून दोघंही आपली सत्ता टिकवून आहेत. दोघंही लोकशाहीच्या वाटेनं हुकूमशहा झाले आहेत. इराणच्या जनतेनं जसं हुकूमशहा उरावर घेतले तसेच इस्रायल आणि अमेरिकेची जनता हुकूमशहा उरावर घेतेय. दोन हुकूमशहांनी टोळी करून तिसऱ्या हुकूमशहाला संपवलंय.

**- निळू दामले.**

# अनिष्ट प्रथांची होळी करू या!

यंदा १ मार्च २०२६, सोमवार रोजी होलिका दहन आणि २ मार्च २०२६, मंगळवार रोजी धूलिवंदन साजरे होत आहे. हिंदू दिनदर्शिकेनुसार फाल्गुन पौर्णिमेला येणारा हा सण केवळ रंगांचा नव्हे, तर सद्भावना, समता आणि नवचैतन्याचा उत्सव आहे. सध्या वाढत्या उष्णतेच्या आणि संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर होळी साजरी करताना आपली सामाजिक जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरते. उत्साहात एकमेकांवर पाणी उधळण्याऐवजी केवळ गुलाल लावून, नैसर्गिक रंगांचा वापर करून आणि पाण्याची बचत करून हा सण साजरा करणे हीच खरी काळाची गरज आहे.



**पौराणिक आणि आध्यात्मिक महत्त्व**

होलिका दहनाच्या मागे वाईटावर चांगल्याचा विजय ही प्रेरणादायी कथा आहे. असुरराज हिरण्यकश्यपूचा अहंकार, भक्त प्रल्हादाची निष्ठा आणि भगवंताची कृपा, या कथेतून श्रद्धा, संयम आणि सत्य यांचा विजय अधोरेखित होतो.

होलिका दहन म्हणजे केवळ लाकूड जाळणे नव्हे, तर आपल्या मनातील मत्सर, द्वेष, अंधश्रद्धा आणि अनिष्ट प्रथांची होळी करणे होय. धूलिवंदन म्हणजे रंगांच्या माध्यमातून सर्व भेदभाव विसरून एकमेकांना स्वीकारण्याचा दिवस. जात, पंथ, श्रीमंती, गरीबी यांतील भिंती रंगांच्या एका स्पर्शाने विरघळून जातात, हीच या सणाची खरी आध्यात्मिक अनुभूती आहे.

**होळी आणि हिंदी चित्रपटसृष्टी**

होळीचा सण आणि हिंदी चित्रपटसृष्टी यांचे नाते अतूट आहे. 'शोले'मधील 'होली के दिन दिल खिल जाते हैं' हे गाणे आजही प्रत्येक पिढीला उत्साह देते. 'सिलसिला' मधील रंग बरसे हे गीत रंगोत्सवाचे जणू प्रतीकच बनले आहे, तर 'बागबान' मधील कुटुंबियांसोबत साजरी केलेली होळी आपल्याला नात्यांचे रंग जपण्याचा संदेश देते. चित्रपटांतील होळी ही केवळ नृत्य-गाण्यांची पर्वणी नसून प्रेम, पुनर्मिलन आणि आनंदाचा उत्सव म्हणून सादर केली जाते.

**वैज्ञानिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोन**

पूर्वी होलिका दहनात औषधी गुणधर्म असलेल्या झाडांच्या फांद्या वापरल्या जात. धुरामुळे वातावरणातील जंतू नष्ट होतात, अशी लोकमान्यता आहे. परंतु आज अतिरेक टाळणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड करून होळी करणे पर्यावरणासाठी घातक ठरते.तसेच रासायनिक रंगांमुळे त्वचेचे विकार, डोळ्यांचे त्रास आणि केसांचे नुकसान होऊ शकते. म्हणूनच हळद, गुलाब, पालक, बीट यांसारख्या नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले रंग वापरणे हितावह आहे.

**पाणी वाचवा : आनंद वाढवा**

राज्यातील अनेक भागांत उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. पाणीटंचाईचे संकट डोळ्यांसमोर ठेवून ड्राय होळी साजरी करणे ही सामाजिक बांधिलकी आहे. एका हिंदी कवीचे शब्द आज अधिक अर्थपूर्ण वाटतात- 'जी भर के तुम खेलो होली, पर इतना रखना खयाल, केवल लगाओ गुलाल केवल लगाओ गुलाल'

**होळीचा खरा संदेश**

होळी म्हणजे मनातील कलुषित विचारांची होळी, अनिष्ट प्रथा आणि अंधश्रद्धांचा त्याग, पर्यावरणपूरक जीवनशैलीची सुरुवात आणि प्रेम, बंधुता, समतेचा रंगोत्सव. यंदा होळी साजरी करताना आपण एक संकल्प करूया-झाडे जपूया, पाणी वाचवूया आणि अनिष्ट रुढींची होळी करूया ! रंगांच्या या सणात प्रेम, आनंद आणि सामाजिक जाणीव यांचेही रंग मिसळूया.

**- प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ.

## जनमानस

### अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते

होळी हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस.

महाराष्ट्रात हा सण उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला 'धुळवड' असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे.

या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तींमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तींमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.